# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०५/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन खापरखेडा ची कारवाई

दिनांक ३१/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता **आरोपी क्र. १) रजत उर्फ सतीश जनार्धन ईगोले, रा. डोरली ता. पारशिवनी खापरखेडा व आरोपी क्र. २) विनोद गणपत मोजे, रा. वार्ड नं ३ देहेगाव** हे दिनांक ३१/५/२४ चे ०३/२० वा. चे दरम्यान पारशिवनी टि पॉईट भानेगांव येथे कोणताही परवाना नसतांना अवैदयरित्या उत्खनन करुन ४ ब्रास रेती किंमती अंदाजे १६०००/— रु ची वाहतुक करतांना मिळुन आल्याने एकुन १,१६,०००/— रु चा मुददेमाल जप्त करुन आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवी सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल सांहिता १९६६, सहकलम ४/२१ खान खनिज अधि १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन केळवदची कारवाई

दि. ३०/०५/२०२४ रोजी नांदागोमुख शिवार येथे नमुद **आरोपी नामे— नितीन डिगांबर खोपे, रा. पिपळा (केवलराम) तह. नरखेड जि. नागपुर** याने आपले ताब्यातील महिंद्रा ट्रॅक्टर विना क्रमांकाचे व ट्रॉली विना क्रमांकाची ट्रॉलीमध्ये अवैध्यरित्या विना परवाना गौनखनिज रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन महिंद्रा ट्रॅक्टर विना क्रमांकाचे व ट्रॉली विना क्रमांकाची ट्रॉली किंमत ६,००,०००/— रू व एक ब्रॉस रेती किमती ५,०००/— रु असा एकुण ६,०५,०००/— रू चा माल जप्त करून सदर आरोपी याचेवर कलम ३७९ भादंवी सहकलम ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम सहकलम—३ सार्वजनिक मालमत्ता नूकसान अधिनियम, सहकलम ४/२१ खान खनिजे अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि. राकेश साखरकर यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर